**विशेष दिवाणी दावा क्र. ११६/२०१६ मधील निशाणी १२९ वरील आदेश.**

(निलेश सुभाष गांधी वि. मे. अरिहंत डेव्हलपर्स व इतर)

(CNR No. MHSN020007562016)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १,३ व ४ यांनी वादी यांनी निशाणी क्रमांक ११८ कडे दाखल अर्जावर झालेला 'म्हणणे नाही' असा आदेश रद्दबातल होऊन म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. वादी यांनी प्रस्तुत कामी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. परंतु, दिनांक २९/१०/२०२५ रोजी प्रस्तुत प्रतिवादींना म्हणणे देणे शक्य झाले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज विनाम्हणणे चालविण्यात यावा असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. मुळातच दावा दुरुस्ती अर्जातील मजकुर संयुक्तीक नसून, कायदेशीर नाही प्रतिवादी क्र. १ भागीदार तर्फे भागीदार पुष्पा कवेडीया यांचा मृत्यु झाल्याने व त्यापुर्वी त्या अनेक शारीरिक व्याधींनी ग्रासलेल्या असल्याने व त्यांच्यावर वेगवेगळया दवाखान्यामध्ये उपचार शस्त्रक्रिया चालू असल्याने प्रतिवादी क्र. १, ३ व ४ म्हणजेच कवेडिया कुटूंबीय हे मानसिक दृष्टया खचून जावून त्यांचे आर्थिक नुकसान झाले होते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १,३ व ४ यांना वादी यांच्या निशाणी क्र. ११८ कडील अर्जास वेळेत म्हणणे देता आले नाही. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा विलंब त्यांनी जाणुनबुजुन केलेला नाही. या व इतर कारणांवरुन प्रतिवादींनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी क्रमांक १३१ कडे त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. अर्जात नमुद कारण संयुक्तीक नसुन ते काल्पनिक आहे. वादी यांनी निशाणी ११८ कडील अर्ज हा दिनांक २३/०६/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. त्यानंतर बऱ्याच तारखेस प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल कले नसल्यामुळे

मा. न्यायालयाने त्यांच्या विरुध्द 'म्हणणे नाही' असा आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यासाठी बराच विलंब केलेला आहे. तसेच प्रतिवादी यांनी अर्जात दिलेले भागीदार पुष्पा कवेडियायांचे आजारपणाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी सादर केलेला नाही. या सर्व कारणाकरीता, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा रक्कम वसुली, हक्कज्ञापना करिता व निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी दिनांक २३/०६/२०२५ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. परंतू, प्रतिवादींनी त्या अर्जावर म्हणणे वेळेत दाखल केले नसलयामुळे त्यांच्या विरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत झालेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे गरजेचे वाटते. प्रस्तुत प्रतिवादी यांना निश्चितच म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणून म्हणणे नाकारणे न्यायोचित होणार नाही. उलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही परिणामी त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## :: आदेश ::

१. अर्ज नि.१२९ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी यांनी वादींना रक्कम रु.५००/– द्यावेत.

VIBHA PRAKASH GAIKWAD Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD Date: 2025.11.20 10:46:55 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. १९/११/२०२५ सह–दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.